**नगरसचिव कार्यालय**
**पुणे महानगरपालिका**
**दिनांक :-१८/५/२०२६**

**-: परिपत्र :-**

**पुणे महानगरपालिका मुख्य सभेच्या कामकाजाच्या नियमापैकी नियम क्र. १ (के) अन्वये सोमवार दिनांक १८ मे २०२६ रोजी दुपारी ३:०० ( तीन ) वाजता भरलेल्या माहे मे २०२६ या मासिक सभेच्या कार्यपत्रिकेवर तातडीचे म्हणून दाखल करुन घेण्यात आलेले विषय.**

**विषय क्र.१/५४**

संदर्भ- १) राष्ट्रीय अग्निशमन सेवा महाविद्यालय, नागपूर यांचे सन २०२२ चे प्रवेशाचे नियम.
२) महाराष्ट्र अग्निशमन व आपत्कालीन सेवा संचालनालय, मुंबई यांचे जावक क्र.मअसे-२०२६/५३/२९९,दि.६/३/२०२६ रोजीचे परिपत्रक
३) मा.बापू मानकर व मा.अपूर्व खाडे यांचे दि.१३/५/२०२६ चे पत्र.
४) मा.विधी समिती ठराव क्र.२,दि.१३/५/२०२६

----

मा.विधी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरून -

पुणे महानगरपालिकेतील अग्निशामक दलातील कर्मचाऱ्यांबाबत खालील बाबींस मान्यता द्यावी,अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस करण्यात येत आहे.

१) पुणे महानगरपालिका सब ऑफिसर प्रशिक्षणासाठी उमेदवारांची निवड करताना उपरोल्लेखित शासन नियम, परिपत्रके व प्रवेश अटींचे काटेकोर पालन करण्यात यावे.
२) सब ऑफिसर पाठ्यक्रमासाठी किमान १० वी उत्तीर्ण ही आवश्यक शैक्षणिक पात्रता व इतर निकष पूर्ण करणाऱ्या सर्व पात्र कर्मचाऱ्यांना समान संधी देण्यात यावी.
३) तरी यापुढील काळात पुणे महानगरपालिकेतील अग्निशमन दलातील कर्मचाऱ्यांवर अन्याय होणार नाही. या दृष्टीने सर्वांना समान संधी मिळणेसाठी सेवा ज्येष्ठतेनुसार व शासन परिपत्रकात उल्लेख केलेल्या किमान शैक्षणिक पात्रतेच्या अटींवर प्रशिक्षणास पाठविण्यास.

**विषय क्र.२/५५**

संदर्भ- १) मा.शैलजीत बनसोडे व मा.सौ.अर्चना जगताप यांचे दि.१३/५/२०२६ चे पत्र.
२) मा.विधी समिती ठराव क्र.३,दि.१३/५/२०२६

----

मा.विधी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरून -

पुणे महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील सहाय्यक आयुक्त हे पद पदोन्नतीने भरणेसाठी दि.२६/८/२०१४ रोजीच्या मंजूर सेवा प्रवेश नियमामध्ये नमूद केलेल्या नामनिर्देशनासाठी विहित केलेली शैक्षणिक अर्हता धारण करणाऱ्या पुणे महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील सेवा ज्येष्ठता व गुणवत्ता या आधारे प्रशासन अधिकारी ( विभाग प्रमुख ) संवर्गातील कर्मचाऱ्यांमधून किमान ०३ वर्षाचा अनुभव या अर्हतेमध्ये पुढीलप्रमाणे सुधारणा करण्यास मान्यता द्यावी,अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस करण्यात येत आहे.

नामनिर्देशनासाठी विहित केलेली शैक्षणिक अर्हता धारण करणाऱ्या पुणे महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील प्रशासन अधिकारी ( विभाग प्रमुख ) सहाय्यक विधी अधिकारी या संवर्गातील कर्मचाऱ्यांच्या संयुक्त सेवाज्येष्ठता यादीमधून किमान ०३ वर्षाचा अनुभव असलेल्या कर्मचाऱ्यांमधून सेवा ज्येष्ठता व गुणवत्ता या आधारे भरण्यात यावीत.

**विषय क्र.३/५६**

संदर्भ- १) मा.अति.महा.आयुक्त ( इ) यांचे जा.क्र.४२५३,दि.२७/२/२०२६ चे पत्र.
२) मा.पक्षनेते सभेच्या दि.५/५/२०२६ रोजी झालेल्या सभेतील निर्णय
३) नाव समिती ( नैमित्तीक समितीची) दि.१२/५/२०२६ रोजी सकाळी ११=३०(अकरा वाजून तीस मिनिटे ) वाजताचे नाव समितीचे निवेदन.

विषय- पुणे मनपा हद्दीतील रस्ते, चौक, उड्डाणपूल, भुयारी मार्ग, वाहनतळे व पुणे महानगरपालिकेच्या मालमत्ता यांचे नामकरण प्रस्ताव मा.नाव समितीमार्फत मा.मुख्य सभा, पुणे मनपा यांचेकडे मान्यतेसाठी सादर करण्यासाठी प्रस्तावित कार्यपध्दती / धोरण निश्चितीकरण करणेबाबत मा.पक्षनेता सभेचा निर्णय विचारासाठी.

----

वरील विषयांकित बाबींवर निर्णय घेण्यासाठी नैमित्तिक समितीची (नांव समितीची) सभा **मंगळवार दिनांक १२/५/२०२६ रोजी सकाळी ११:३० ( अकरा वाजून तीस मिनिटे ) वाजता** समितीच्या सभागृहात भरली होती.

**सदर सभेस खालील मा. सभासद उपस्थित होते.**

१) मा.जावळे पल्लवी चंद्रशेखर, अध्यक्षा
७) मा.भालेराव वैशाली नागनाथ

२) मा.पांडे सुनील नामदेव, उपाध्यक्ष
३) मा.उज्वला गणेश यादव
४) मा.अश्विनी राहुल भंडारे
५) मा.दाभाडे दत्तात्रय रामदास
६) मा.पवार रूपाली सचिन
८) मा.भोसले शैलजा अरूण
९) मा.लोंढे खंडू सतीश
१०) मा.विवेक महादेव यादव
११) मा.श्वेता सचिन घुले

**अधिकारी वर्ग –**

१) मा.योगिता भोसले , नगरसचिव
२) मा.उल्का कळसकर, सह महा.आयुक्त तथा मुख्य लेखा व वित्त अधिकारी
३) मा.दिनकर गोंजारी, मुख्य अभियंता, प्रकल्प
४) मा.अशोक घोरपडे, महा.सहा.आयुक्त, उद्यान विभाग
५) मा.रामदास चव्हाण, मुख्य समाज विकास अधिकारी
६) अतिक्रमण विभागाचे प्रतिनिधी

**खालील विषय मा.नांव समितीत मान्य झाला असून सदरचा विषय मान्यतेसाठी मा.मुख्य सभेकडे पाठविण्यात यावा.**

| १ | तपशील | निर्णय |
|---|---|---|
| | पुणे मनपा हद्दीतील रस्ते, चौक,उड्डाणपूल, भुयारी मार्ग, वाहनतळे व पुणे महानगरपालिकेच्या मालमत्ता यांचे नामकरण प्रस्ताव मा.नाव समितीमार्फत मा.मुख्य सभा, पुणे मनपा यांचेकडे मान्यतेसाठी सादर करण्यासाठी प्रस्तावित कार्यपध्दती/धोरण निश्चितीकरण करणेबाबतचे मा.अति.महा.आयुक्त (इ) यांचे जा.क्र.४२५३, दि.२७/२/२०२६ चे पत्रास अनुसरून झालेला मा.पक्षनेता सभेचा दि.५/५/२०२६ चा निर्णय विचारासाठी.<br>मा.गणेश बिडकर, सभागृहनेता व मा.निलेश निकम, विरोधी पक्षनेता यांची मा.पक्षनेते सभेतील खालीलप्रमाणे उपसूचना.<br>पुणे शहरातील मोठे प्रकल्प, उद्याने या बाबतीतील नाव देण्याचे धोरण विषयक कामकाज यापुढील काळात मा.पक्षनेतेच्या सभेमध्ये मान्यता घेऊन मा.नाव समिती मार्फत मा.मुख्य सभेच्या मान्यतेकडे पाठविण्यात यावेत.तसेच यापूर्वी उद्यानांच्या नावांच्या संदर्भात मान्य झालेला मा.मुख्य सभा ठराव क्र.११०,दि.२४/७/२००० निरस्त करण्यात यावा. महानगरपालिका अधिनियमानुसार याबाबत कोणतीही स्पष्ट तरतूद नाही. ती फक्त राष्ट्रीय ख्यातीच्या व्यक्तींचीच नावे उद्यांनाना देण्यात यावी. सबब यापूर्वीचा ठराव रद्द करणेस सर्वानुमते शिफारस करण्यात येत आहे. अशी दि.५/५/२०२६ रोजीच्या मा.पक्षनेते सभेतील उपसूचना विचारासाठी.<br>तसेच मा.नाव समितीचे दि.१२/५/२०२६ च्या सभेतील मा.पांडे सुनील नामदेव, मा.भालेराव वैशाली नागनाथ, मा.जावळे पल्लवी चंद्रशेखर, मा.श्वेता सचिन घुले, मा.भोसले शैलजा अरूण, मा.विवेक महादेव यादव, मा.अश्विनी राहुल भंडारे, मा.उज्वला गणेश यादव, मा.दाभाडे दत्तात्रय रामदास यांची दि.१२/५/२०२६ रोजी भरलेल्या नाव समिती सभेतील खालीलप्रमाणे उपसूचना विचारासाठी.<br>महानगरपालिकेच्या सर्व वास्तूंसाठी देखील सदर धोरण मान्य करावे. सदर प्रस्तावातील चार सदस्यीय प्रभाग पध्दतीमध्ये संबंधित प्रभागातील चार ही निर्वाचित स्थानिक सभासदांच्या सूचक व अनुमोदक म्हणून स्वाक्षरी असणे आवश्यक आहे. नाव देणेबाबत एकमत न झाल्यास किमान तीन निर्वाचित सदस्यांच्या स्वाक्षरीस मान्यता देण्यात यावी. तसेच पाच सभासदांच्या प्रभागामध्ये पाच ही सभासदांची स्वाक्षरीस प्राधान्य द्यावे.तथापि नाव देणेबाबत एकमत न झाल्यास किमान चार निर्वाचित सदस्यांच्या स्वाक्षरीस मान्यता द्यावी. तसेच दोन प्रभागांच्या सीमारेषेवरील उड्डाणपूल, भुयारी मार्ग असल्यास त्या अंतर्गत येणाऱ्या दोन प्रभागातील एकमताने आठ किंवा एकमत न झाल्यास किमान सहा सभासदांच्या स्वाक्षरी असणे आवश्यक आहे अशी दुरूस्ती करण्यात यावी. तसेच तीन प्रभागांच्या सीमेवर असेल तर सर्व निर्वाचित बारा सदस्यांच्या स्वाक्षरीस प्राधान्य राहील. तथापि एकमत न झाल्यास किमान नऊ स्थानिक निर्वाचित सदस्यांच्या स्वाक्षरी आवश्यक असतील. तसेच महापुरूषांची नावे दिली जातात त्याठिकाणी संकल्पना नसावी. | उपसूचनेसह दुरूस्त प्रस्ताव मान्य |

**विषय क्रमांक:– ४/५७**

संदर्भ– १) मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/इओ/२०१८,दि.१८/३/२०२६ चे पत्र.
२) मा.शिक्षण समिती ठराव क्र.२,दि.१०/४/२०२६ चा अभिप्राय विचारासाठी.
३) मा.मयुरी कोकाटे यांची दि.१४/५/२०२६ ची उपसूचना.
४) मा.स्थायी समिती ठराव क्र.१६३,दि.१४/५/२०२६

––––

मा.स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरून व संदर्भ क्र.३ च्या उपसूचनेनुसार –

संत तुकाराम माध्यमिक विद्यालय, पाषाण येथे इयत्ता ११ वी व इयत्ता १२ वी मराठी माध्यम विज्ञान, वाणिज्य आणि कला कनिष्ठ महाविद्यालय सुरू करणेस मान्यता द्यावी,अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस करण्यात येत आहे.

१) शैक्षणिक वर्ष २०२६–२७ मध्ये संत तुकाराम माध्यमिक विद्यालय, पाषाण येथे इयत्ता ११ वी व इयत्ता १२ वी मराठी माध्यम कला, वाणिज्य आणि विज्ञान या शाखा वर्ग सुरू करणेस.

२) मा.मुख्य सभेच्या मान्यतेनंतर सदर प्रस्ताव मे.राज्य शासनाकडे मान्यतेसाठी सादर करणेस.

३) मे.राज्य शासनाची मान्यता प्राप्त झाल्यानंतर शैक्षणिक वर्ष २०२६–२७ मध्ये संत तुकाराम माध्यमिक विद्यालय, पाषाण येथे इयत्ता ११ वी व इयत्ता १२ वी कला, वाणिज्य आणि विज्ञान मराठी माध्यम या शाखा वर्ग सुरू करणेसाठी जाहीर प्रकटन देवून, पुणे महानगरपालिका व स्वयंसेवा संस्था यांचे संयुक्त विद्यमाने सुरू करणेस व सदर संस्थेबरोबर करारनामा करणेचे अधिकार मा.महापालिका आयुक्त यांना देणेस.

**संदर्भ क्र.३ च्या उपसूचनेनुसार –**

संत तुकाराम माध्यमिक विद्यालय,पाषाण ही ०५ मजली इमारत असून, प्रत्येक मजल्यावर ०५ अशा प्रकारे २५ खोल्या आहेत. सदर ठिकाणी इयत्ता ११ वी व इयत्ता १२ वी मराठी माध्यम विज्ञान, वाणिज्य आणि कला कनिष्ठ महाविद्यालय सुरू करताना त्या ठिकाणी येणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या पाहता इयत्ता ११ वी इयत्ता १२ वी चे वर्ग सुरू करणेसाठी ०१ मजल्यावरील ०५ खोल्या पुरेशा आहेत.

सदर ०५ खोल्यांमध्ये जवळपास २०० विद्यार्थी शिक्षण घेऊ शकतात, तरी सदर इमारतीतील ०१ मजला इयत्ता ११ वी व इयत्ता १२ वी मराठी माध्यम विज्ञान, वाणिज्य आणि कला कनिष्ठ महाविद्यालयाचे वर्ग सुरू करणेसाठी आरक्षित करणेस.

**विषय क्रमांकः– ५/५८**

संदर्भ– १) मालमत्ता व व्यवस्थापन विभागाकडील आ.क्र.१०१६१,दि.१८/१/२०२३ मिळकतधारक श्री.सुनिल जगन्नाथ चरवड व श्री.अनिल जगन्नाथ चरवड यांचा प्रस्ताव.

२) मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/मालमत्ता/७७,दि.६/५/२०२६ चे पत्र.

३) मा.स्थायी समिती ठराव क्र.१६५,दि.१४/५/२०२६

----

मा.महा.आयुक्त यांनी केलेली शिफारस विचारात घेऊन –

पुणे पेठ वडगाव खु.स.नं.मधील ५८/३ व ५८/४ या मिळकतीचे एस.डब्ल्यू–५ आरक्षणाने बाधित होणाऱ्या क्षेत्रांचे रोख मोबदला आदा करणेसाठी खालील बाबींस मान्यता द्यावी,अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस करण्यात येत आहे.

१) पुणे पेठ वडगाव खु.स.नं.५८ मधील ५८/३ व ५८/४ या मिळकतीचे एस.डब्ल्यू–५ आरक्षणाने बाधित ४३२.८३ चौ.मी.एवढया क्षेत्राचे मिळकतधारक श्री.सुनिल जगन्नाथ चरवड व अनिल जगन्नाथ चरवड यांना रोख मोबदल्यापोटी र.रू.१,७०,८४,७००/– आदा करणेस तसेच स्टॅम्प डयुटी आणि रजिस्ट्रेशन फी र.रू.१२,२५,९५०/– पुणे मनपा मार्फत स्वतंत्रपणे भरण्यास असे एकूण र.रू.१,८३,१०,६५०/– इतक्या रकमेचा मोबदला आदा करणेस.

**विषय क्रमांकः– ६/५९**

संदर्भ– १) मा.दत्तात्रय बहिरट व मा.अंजली ओरसे यांचे दि.६/४/२०२६ चे पत्र.

२) मा.स्थायी समिती ठराव क्र.४३,दि.९/४/२०२६

३) मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/टीजीओ/९०,दि.१३/५/२०२६ चा अभिप्राय विचारासाठी

४) मा.स्थायी समिती ठराव क्र.१६६,दि.१४/५/२०२६

-----

मा.स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरून –

मा.दत्तात्रय रंगनाथ बहिरट व मा.अंजली ओरसे यांचे प्रस्तावावर झालेला संदर्भ क्र.१ चे ठरावावर दिलेला अभिप्राय खालीलप्रमाणे सादर केलेला आहे.

**मुद्दा क्र.१)** नगविकासिद रमा.प्र./२०२२–लवेसू. रविकास विभाग यांचेकडून शासन निर्णय क्र.०३ मार्च २०२३ रोजी पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील अवैध बांधकामांना देय शास्ती माफ करण्याबाबत जारी केलेले शासन निर्णय त्याच धर्तीवर पुणे शहरातील सर्व पूरग्रस्तांनी व इतर नागरिकांनी गरजेपोटी बांधलेल्या घरांना

लावण्यात आलेल्या तीनपट मालमत्ता कर तातडीने रद्द करण्यात यावा.

**अभिप्राय –** पुणे महानगरपालिका हद्दीतील अनधिकृत बांधकामांना महानगरपालिका अधिनियम अंतर्गत कलम २६७/अ, नुसार शास्ती आकारणेबाबत शासन निर्णय दि.४/१/२००८ नुसार कार्यवाही करण्यात येते त्या अनुषंगाने मालमत्ता कर रद्द करावयाचा झाल्यास शासनाने निर्णय घेणे अपेक्षित आहे.

**मुद्दा क्र.२) –** संदर्भ क्र.४ नवी मुंबई महानगरपालिका आयुक्त यांनी प्रकल्पग्रस्ताच्या गरजेपोटी बांधलेल्या अवैध घरांना मूळ मालमत्ता करावरील आकारण्यात आलेली दुप्पट शास्ती वसूल करण्यास स्थगिती देण्यास जारी परिपत्रकानुसार पुणे महानगरपालिका आयुक्त यांनी आपल्या अधिकारांचा वापर करून मूळ मालमत्ता कर भरणेबाबत परिपत्रक जारी करावे आणि तीनपट मालमत्ता कर ( प्रॉपर्टी टॅक्स ) ला स्थगिती देवून अन्यायकारक जुलमी प्रॉपर्टी टॅक्सपासून पूरग्रस्त नागरिकांना दिलासा द्यावा व सदरचे परिपत्रक जारी करणेकामी संदर्भ क्र.३ प्रमाणे विधी विभाग, पुणे मनपा कार्यालयाने श्री.दत्ता बहिरट यांच्या मागणीनुसार कर आकारणी व कर संकलन कार्यालय,पुणे मनपा जावक क्र.१९०७ यांचे दि.२१/८/२०२३ रोजीच्या पत्रावर दि.२०/९/२०२६ रोजी जावक क्र.३२०० प्रमाणे दिलेले सुस्पष्ट अभिप्राय दिलेला आहे. सोबत त्याची,प्रत जोडली आहे.

तीनपट मालमत्ता कर ( प्रॉपर्टी टॅक्स ) व दंड रद्द करण्याबाबत शासन निर्णय जारी करण्यासाठी उचित कार्यवाही पूर्ण करणेबाबत मा.मुख्यमंत्री यांचेकडून महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग यांचेकडून दि.७/२/२०२५ रोजीचे क्र.पीएमसी–२०२५/प्र.क्र.४८/नवि/२२ प्रमाणे निर्देश प्राप्त झाले आहेत.

त्यामुळे मी व गोखले नगर–जनवाडी पूरग्रस्त वसाहत नागरी कृती समिती आम्ही सर्व आपणाकडे विनंती करतो की, तीनपट मालमत्ता कर ( प्रॉपर्टी टॅक्स ) व दंड रद्द करण्याबाबतचा शासन निर्णय जारी करणेसाठी दि.७/२/२०२५ रोजीच्या पत्रावर उचित कार्यवाही पूर्ण करून या विषयाचा अहवाल नगर विकास खात्याकडे पाठवावा. सोबतच अन्यायकारक जुलमी तीनपट मालमत्ता कर ( प्रॉपर्टी टॅक्स ) रद्द करणेबाबत शासन निर्णय जारी होईपर्यत संदर्भ क्र.३ प्रमाणे विधी विभाग पुणे महानगरपालिकेने दिलेले अभिप्राय पाहता आपण आपल्या अधिकारात संदर्भ क्र.२ नवि मुंबई महानगरपालिका आयुक्त यांनी प्रकल्प ग्रस्तांच्या गरजेपोटी बांधलेल्या अवैध घरांना मूळ मालमत्ता करावरील आकारण्यात आलेली दुप्पट शास्ती वसूल करण्यास स्थगिती देण्यास जारी परिपत्रकाप्रमाणे तातडीने पुणे शहरासाठी परिपत्रक जारी करावे आणि पूरग्रस्त नागरिकांना जुलमी तीनपट ( प्रॉपर्टी टॅक्स ) पासून दिलासा द्यावा.

**अभिप्राय –** महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम २६७अ, अन्वये अनधिकृत बांधकामावर शास्ती आकारली जाते. विधी विभागाचा उक्त अभिप्राय हा प्रकरण ८ कराधान नियम ५१ शी निगडीत आहे. नियम ५१ हा अनधिकृत बांधकामावरील शास्तीसाठी लागू होत नाही.

**मुद्दा क्र.३)** AI सर्व्हे झाल्यानंतर पूरग्रस्त नागरिकांना लावण्यात आलेला ( प्रॉपर्टी टॅक्स ) रद्द करावा तसेच त्यांना आधीच मूळ कर भरण्याची परवानगी द्यावी.

**अभिप्राय –** मा.कक्ष अधिकारी महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग मंत्रालय ( मुख्य इमारत ) ४ था मजला, मादाम कामा मार्ग, हुतात्मा चौक मुंबई ४०००३२ यांसी महापालिका आयुक्त कार्यालय पुणे महानगरपालिका जा.क्र.मआ/tgo /११४०,दि.२/७/२०२४ रोजी कळविले आहे.

तसेच तीनपट मालमत्ता कर कमी करणेबाबत खात्याच्या स्तरावर जागेवर जाऊन समक्ष तपासणी करून त्याबाबत उचित निर्णय घेण्यात येईल.

**मुद्दा क्र.४)** पूरग्रस्त नागरिकांनी गरजेपोटी बांधलेल्या बांधकामाचे नव्याने कर आकारणी करताना जाचक अटी न ठेवता नागरिकांच्या मागणीप्रमाणे उपलब्ध कागदपत्रांच्या आधारे सध्याच्या दिनांकाप्रमाणे विभक्तीकरण करून कर आकारणी करण्यात यावी.यासाठी कर भरणा अभय योजनेच्या धर्तीवर विशेष कर आकारणी अभय योजना राबवावी.

**अभिप्राय –**पूरग्रस्त नागरिकांनी नव्याने केलेल्या बांधकामाबाबत प्रचलित दराने कर आकारणी करणे क्रमप्राप्त आहे.

अशा आशयाचा मा.महा.आयुक्त यांचा अभिप्राय अवलोकन करून स्वीकृत करण्यात आल्याची बाब मा.मुख्य सभेच्या निदर्शनास आणण्यात यावी.

**विषय क्रमांक:– ७/६०**

संदर्भ– १) मा.सुहास विजय टिंगरे व मा.डॉ.दादा कोद्रे यांचे दि.१४/५/२०२६ चे पत्र.
२) मा.स्थायी समिती ठराव क्र.१७९,दि.१४/५/२०२६

-----

मा.स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरून –

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण आठ कराधान नियम–मालमत्ता कराच्या

आकारणीस पात्र असलेल्या जागांचे हस्तांतरण इत्यादी विषयी नोटीस यामध्ये नियम क्र.४१ मध्ये नमूद केल्याप्रमाणे बिलाच्या न दिलेल्या रकमेवर शास्ती आकारणे या विषयात थकीत बिलावर २% इतकी रक्कम शास्ती म्हणून घेण्यात येते. या ठरावाद्वारे यापुढील काळात शास्ती थकीत बिलावर १% एवढीच घेण्यात यावी.तसेच याबाबत महाराष्ट्र शासनाची मान्यता घेऊन यांची अंमलबजावणी करणेस मान्यता द्यावी,अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस करण्यात येत आहे.

**विषय क्रमांक:– ८/६१**

संदर्भ– १) मा.वैशाली बनकर व मा.सुहास टिंगरे यांचे दि.१४/५/२०२६ चे पत्र.

२) मा.स्थायी समिती ठराव क्र.१८०,दि.१४/५/२०२६

-----

मा.स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरून –

पुणे महानगरपालिकेतील ८०% टक्केच्या वर मार्क्स पडलेल्या पुणे शहरातील खाजगी शाळेतील मुलांचे हार्दिक अभिनंदन करण्यात यावे,अशी विनंती मा.मुख्य सभेकडे करण्यात येत आहे.

**विषय क्रमांक:– ९/६२**

संदर्भ– १) मा.सुहास टिंगरे व मा.वैशाली बनकर यांचे दि.१४/५/२०२६ चे पत्र.

२) मा.स्थायी समिती ठराव क्र.१८२,दि.१४/५/२०२६

-----

मा.स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरून –

पुणे शहराला ऐतिहासिक,सांस्कृतिक आणि स्थापत्य वारसाची समृध्द परंपरा लाभलेली आहे. पुण्यातील पेशवे काळात उभारण्यात आलेली कात्रज ते शनिवारवाडा भूमिगत पाणीपुरवठा योजना ही त्या काळातील अद्वितीय अभियांत्रिकी कौशल्य, नगररचना आणि लोककल्याणकारी दृष्टीकोनाचे उत्कृष्ठ उदाहरण आहे. कात्रज तलाव येथून नैसर्गिक उताराचा वापर करून भूमिगत दगडी व मातीच्या पाईपद्वारे शहरात आणि शनिवारवाडा परिसरात पाणीपुरवठा करण्यात येत होता. सुमारे २० किलोमीटर अंतरावरील ही जलवाहिनी त्या काळातील वैज्ञानिक दृष्टिकोन आणि जलव्यवस्थापनाचा उत्कृष्ठ नमुना मानली जाते.आज या ऐतिहासिक वारसाचे अनेक अवशेष दुर्लक्षित अवस्थेत असून काही भाग नष्ट होण्याच्या स्थितीत आहेत. त्यामुळे पुण्याच्या ऐतिहासिक ओळखीचे जतन करण्यासाठी तसेच भावी पिढ्यांना हा अनमोल वारसा समजावा यासाठी सदर योजनेचा संपूर्ण अभ्यास, संवर्धन आणि जीर्णोद्धार करणे अत्यंत आवश्यक आहे. पुण्याच्या वैभवशाली इतिहासाचे प्रतिक असलेल्या या जलव्यवस्थेचे पुनरूज्जीवन झाल्यास शहराच्या वारसा संवर्धनात मोलाची भर पडेल आणि भविष्यातील पिढयांसाठी हा अभिमानाचा ठेवा जतन व्हावा, याकरिता महानगरपालिकेकडून कात्रज ते शनिवारवाडा या संपूर्ण पेशवेकालीन जलवाहिनीचे पुरातत्व व तांत्रिक सर्वेक्षण करण्यात यावे. अस्तित्वात असलेल्या भूमिगत पाईपलाईन, हौद व जलसाठ्यांचे जतन व पुनर्बांधणी करण्यात यावे. या ऐतिहासिक जलव्यवस्थेला **वारसा संवर्धन प्रकल्प** घोषित करण्यात यावे. नागरिक व विद्यार्थ्यांसाठी माहिती फलक, अभ्यासदौरे व वारसा पर्यटन उपक्रम सुरू करण्यात यावेत. आवश्यक त्या ठिकाणी राज्य पुरातत्व विभाग व इतिहास संशोधकांचे मार्गदर्शन घेण्यात यावे. या योजनेच्या संवर्धनासाठी विशेष निधीची तरतूद करणेस मान्यता द्यावी,अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस करण्यात येत आहे.

**विषय क्रमांक:– १०/६३**

संदर्भ– १) मा.संदिप बेलदरे व मा.डॉ.दादा कोद्रे यांचे दि.१३/५/२०२६ चे पत्र.

२) मा.स्थायी समिती ठराव क्र.१९६,दि.१३/५/२०२६

-----

मा.स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरून –

खालीलप्रमाणे र.रू.७५० लक्षचे वर्गीकरण करणेस मान्यता द्यावी,अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस करण्यात येत आहे.

| अर्थशिर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०२६ – २०२७ चे अंदाजपत्रक, पुणे महानगरपालिकेतील विविध भागातील IT विषयक सिस्टीम अत्याधुनिक करणे. बजेट कोड-CE30A101/SI-48 | ७५०लक्ष | --- |

| | | |
|---|---|---|
| नविन सुचविलेली कामे – | | |
| स्वीकृत सदस्य ( शिंदे प्रियांका मंदार ) पुणे शहरात विविध विकास कामे करणे. | --- | २५० लक्ष |
| स्वीकृत सदस्य ( पुरोहीत जयप्रकाश राधाकिसन ) पुणे शहरात विविध विकास कामे करणे. | --- | २५० लक्ष |
| स्वीकृत सदस्य ( शिंदे सुनिल यादव ) पुणे शहरात विविध विकास कामे करणे. ( RE31F/R5-573 ) | --- | ५० लक्ष |
| १) प्रभाग क्र.३१ड, मधील एकता कॉलनी येथे रस्ता विषयक दुरूस्तीची कामे करणे. ( कॉक्रीट, ब्लॉक, डांबर ) | --- | १५ लक्ष |
| २) प्रभाग क्र.३१ड, मधील शास्त्रीनगर येथे रस्त्याचे काम करणे. | --- | १० लक्ष |
| ३) प्रभाग क्र.३१ड, मध्ये विद्युत विषयक कामे करणे. | --- | १० लक्ष |
| ४) प्रभाग क्र.३१ड, मधील सुतार दवाखाना येथे दुरूस्तीची कामे करणे. | --- | १० लक्ष |
| ५) प्रभाग क्र.३१ड,मधील वनाझ कॉलनी समोरील रस्त्यावर ब्लॉक बसविणे | --- | १० लक्ष |
| ६) प्रभाग क्र.३१ड,मधील शिलाविहार कॉलनी येथील रस्ता दुरुस्ती करणे. | --- | २० लक्ष |
| ७) प्रभाग क्र.३९ड,मधील यशवंतराव चव्हाण नाटयगृह शेजारील रस्त्यावर स्ट्रीट पोल बसविणे व प्रकाश व्यवस्था करणे. | --- | १० लक्ष |
| ८) प्रभाग क्र.३९ड,मधील मनपा मालकीच्या ( आर-७) इमारतीची दुरूस्ती करणे | --- | १५ लक्ष |
| ९) प्रभाग क्र.३९ड, मध्ये सार्वजनिक ठिकाणी व्यायामाची उपकरणे बसविणे. | --- | १० लक्ष |
| १०) प्रभाग क्र.३१ड, मधील भेलकेनगर येथील खराब झालेला रस्ता दुरूस्ती करणे | --- | १५ लक्ष |
| ११) प्रभाग क्र.३१ड,मध्ये कोथरूड गावठाणामध्ये ब्लॉक दुरूस्तीची कामे करणे | --- | १५ लक्ष |
| १२) प्रभाग क्र.३१ड,मधील सुतार हॉस्पीटल येथे वॉटरप्रूफिंगचे दुरुस्तीचे काम करणे व स्वच्छतागृह दुरूस्ती करणे. | --- | २० लक्ष |
| १३) प्रभाग क्र.३९ड, मधील मनपा इमारती मधील रहिवासी गाळ्यांची दुरूस्ती करणे. | --- | १० लक्ष |
| १४) प्रभाग क्र.३१ड, मध्ये ग्रामदैवत म्हातोबा मंदिरा समोर दुरूस्तीची कामे करणे | --- | २० लक्ष |
| १५) प्रभाग क्र.३९ड, मधील परमहंसनगर, शास्त्रीनगर येथे नवीन विद्युत पोल उभारणे. | --- | १० लक्ष |

**विषय क्रमांकः– ११/६४**

संदर्भ– १) मा.डॉ.दादा कोद्रे व मा.सौ.रत्नमाला संदिप सातव यांचे दि.९/४/२०२६ चे पत्र.
२) मा.स्थायी समिती ठराव क्र.५३,दि.९/४/२०२६

-----

मा.स्थायी समितीत झालेल्या चर्चेस अनुसरून –

पुणे महानगरपालिका हद्दीमध्ये नव्याने समाविष्ठ गावांपैकी वाघोली व मांजरी या गावामधील वाढते नागरीकरण लक्षात घेता विकसित भागामध्ये नवीन कलेक्शन सिस्टम व मुख्य मलवाहिन्या टाकणे आवश्यक आहे. त्यासाठी मलनि:स्सारण विभागामार्फत वाघोली या समाविष्ठ गावासाठी र.रू.२७३.७२ कोटी व मांजरी या गावासाठी र.रू.१४३.२८ कोटी इतक्या रकमेचे पुर्वगणणपत्रक तयार करण्यात आलेले असून, सदर दोन्ही गावातील मलनिस्सारण विषयक मास्टर प्लॅननुसार मलवाहिन्या विकसित करण्यासाठी सन २०२६-२७ च्या अंदाजपत्रकात प्रत्येकी र.रू.२५ कोटी इतक्या रकमेची तरतूद करण्यात आलेली आहे. सदरची बाब विचारात घेता या कामाचे प्रकल्पीय तरतुदीच्या अनुषंगाने भविष्यात आवश्यक असलेल्या तरतुदीस महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम ७२(ब) अन्वये मान्यता घेऊन निविदा प्रक्रिया राबविण्यास मान्यता द्यावी,अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस करण्यात येत आहे.

**योगिता भोसले**
**नगरसचिव**
**पुणे महानगरपालिका**